(१)

classmate
Date
Page

# - संत वेण्णाबाई -

श्री. स्वामी समर्थ रामदासांच्या शिष्य परिवारातील एक शिष्या संत वेण्णाबाई. त्या मराठी संत होत्या. समर्थांचे सर्वच शिष्य विलक्षण होते. तरीही त्यातील श्री. संत कल्याण स्वामी व संत वेण्णा स्वामी हे दोघे जणु कांहीं समर्थांचे मानस पुत्र व मानस कन्याच होते.

संत वेण्णाबाई यांचा जन्म इ.स. १६२७ मध्ये कोल्हापूर येथे झाला. तेथील गोपाजीपंत देशपांडे यांच्या त्या कन्या होत्या. तत्कालीन प्रथेप्रमाणे लग्न होऊन लहान वयातच त्या मिरजेला सासरी गेल्या. दुर्दैवाने पतीचे अकाली निधन झाले. बाल विधवेचे जीवन जगणे त्यांच्या नशिबी आले. त्या काळी विधवेच जीवन जगणं मोठं कठीण असे. विधवेने फक्त घरात काबाडकष्ट करायचे. व्रतस्थ राहायचे आणि अखंड देवाचं नाव घेत राहायचं. वाचन करता येत असेल तर केवळ धार्मिक ग्रंथच वाचायचे. इतर वाङमय नाही. असा दंडक असे. आयुष्य संपेपर्यंत याच पध्दतीने तिने जीवन कंठायचे.

१६ व्या शतकात समर्थांनी वेगळ्याच हेतूने आपले कार्य सुरू केले होते. त्यांना सर्व समाज संघटीत करायचा होता. धर्मसंघटनेची उभारणी त्यांनी सुरू केली तेव्हां ते मिरजेला भिक्षा मागण्यासाठी आले असतांना त्यांची वेण्णाबाईंशी ओझरती भेट झाली. पुढे कांहीं दिवसांनी समर्थ मिरजेला आले ते वेण्णाबाईंच्या दारात भिक्षा मागण्यास आले. तेव्हां वेण्णाबाई तुळशी वृंदावनापाशी भागवत वाचत बसल्या होत्या. समर्थांनी त्यांना सहजच विचारले "मुली तुला यातले कांहीं समजते आहे कां?" त्यावर वेण्णाबाईंनी आपल्या मनातील अनेक शंका प्रश्न रुपाने समर्थांना

विचारल्या. त्यातून समर्थांनी त्यांची परीक्षा केली. त्याचप्रमाणे स्वामींच्या भेटीने आणि त्यांच्या बोलण्याने वेण्णाबाई खूप प्रभावित झाल्या. त्याच वेळी त्यांनी स्वामींना आपले गुरु मानले. त्यांच्याकडूनच मी उपदेश घेईन आणि त्यांची सेवा हेच माझे जीवनकार्य असे त्यांनी मनोमन ठरविले.

पुढे त्या कोल्हापूरला गेल्या. समर्थ मिरजेला व कोल्हापूरला नेहमी जात असत. तिथे त्यांची कीर्तने होत असत. वेण्णाबाई आवर्जून कीर्तन ऐकायला जात असत. कांहीं काळानंतर समर्थांनी वेण्णाबाईंना कीर्तन करण्याची अनुमति दिली. त्या कीर्तन करु लागल्या पण ते समाजाला आणि धर्मार्तंडांना पटले नाही. त्यांनी त्यांच्यावर विषप्रयोग केला पण वेण्णाबाईंनी समर्थ कृपेने ते विष पचविले. समाजाला पश्चात्ताप झाला. पण ही जनरीतच आहे ना की समाजाच्या उद्धारासाठी क्रांतीकारक काम करणाऱ्याला जननिंदेला सामोरं जावच लागतं.

समर्थ दर रामनवमीला निवडक शिष्यांना बरोबर घेऊन उत्सवासाठी भिक्षेस जात असत. त्यावेळी एखाद्या जबाबदार व्यक्तिला चाफळास ठेऊन उत्सवाची सर्व तयारी करण्याची जबाबदारी त्याच्यावर सोपवित असत.

एक वर्षी ही जबाबदारी वेण्णाबाईंवर आली. उत्सवासाठी सर्व धान्ये निवडून तयार ठेवणे. याशिवाय लोणची, चटण्या, पापड, सांडगे इत्यादी तयारी करून ठेवणे. समर्थ जी भिक्षा चाफळास पाठवित असत ती नीटपणे लावून ठेवणे. अशी सगळी कामं त्यांस करावी लागत. वेण्णाबाईंनी जबाबदारी आनंदाने स्विकारली.

उत्सवाच्या १५ दिवस आधी वेण्णाबाई आजारी

पडल्या. त्या तापाने इतक्या फणफणल्या की त्यांना कांही करणे शक्यच नव्हाते. त्याच परिस्थितीत त्यांनी राम मंदिरातल्या खांबाला धरून रामाची करुणा भाकली. काय आश्चर्य जसे विठ्ठलाने नाना रूपे घेऊन संत जनाबाई संत एकनाथ यांना मदत केली. त्याप्रमाणे प्रभू रामचंद्रांनी रामबाईच्या रूपात येऊन वेण्णाबाईंना मदत केली. मी बत्तीस शिराळ्याची राहणारी आहे समर्थांनी मला तुमच्या मदतीसाठी पाठविले आहे. असे सांगितले. उत्सवाची सगळी कामे पार पडली. समर्थ आल्यावर सगळ्या गोष्टींचा उलगडा झाला. रामबाई गुप्त झाल्या.

समर्थांनी १६५५ मध्ये मिरजेला मठ बांधून वेण्णाबाईंना तिथे ठेवले. पुढील काल क्रमणा त्यांची तिथेच झाली.

वेण्णाबाईंनी कांही उत्तम ग्रंथरचना केल्या.

१) उपदेश रहस्य २) कौल - रामायणी प्रकरण.
३) पंचीकरण- वेदांता वरील मध्य टिप्पण्या. ४) रामगुह संवाद.
५) आदि, अयोध्या, अरण्य, किष्किंधा, व सुंदर कांड.
एकूण दीड हजार श्लोक.
६) सीता स्वयंवर - चौदा समास - ओवी संख्या १५६८.
स्फुट अभंग पदे वगैरे त्यांची ग्रंथसंपत्ति.

वेण्णाबाईचा मृत्यु अंदाजे इ.स. १७०० मध्ये झाला त्यांची समाधि सज्जनगड येथे आहे.



आशा पावगी
"आनंदवन,"
B-10
वृंदावन कॉम्प्लेक्स
कोथरूड.